जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID** : crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक -४८०　　　दिनांक -०१/०७/२०२३**

## मुंढवा पोलीस स्टेशन पुणे शहर

### दोन अल्पवयीन कडुन एकुण ०५ दुचाकी व जबरी चोरीचे ०६ किंमती मोबाईल असा एकुण २,२८,५००/- रु.चा मुद्देमाल केला जप्त

दिनांक ३०/०४/२०२३ रोजी मा. वरीष्ठ पोलीस निरीक्षक, श्री. विष्णु ताम्हाणे व पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री काकडे यांचे मार्गदर्शनाखाली मुंढवा पोलीस ठाणे तपास पथक अधिकारी सहा. पोलीस निरीक्षक, संदीप जोरे व तपास पथक स्टाफ असे मुंढवा पोलीस ठाणे दाखल जबरी चोरीचा गुन्हा रजि. नं. २०३/२०२३ भादंवि कलम ३९२, ३४ प्रमाणे दाखल गुन्हयातील अज्ञात आरोपीचा शोध घेत होते. त्यादरम्यान मुंढवा तपास पथकातील पोलीस अंमलदार दिनेश राणे व स्वप्नील रासकर यांना त्यांचे गोपनीय बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, दोन इसम मुंढवा रेल्वे ब्रीज खाली चोरीचे मोबाईल विक्रीसाठी घेवुन येणार आहेत.

सदरची बातमीची खात्री करुन सदरची बातमी वरीष्ठ पोलीस निरीक्षक, विष्णु ताम्हाणे यांना कळवुन त्यांनी याबाबत मा.वरिष्ठ अधिकारी यांना माहिती देवून सदरबाबत तात्काळ पुढील कारवाईचे आदेश दिले. मुंढवा तपास पथक अधिकारी सहा. पोलीस निरीक्षक, संदीप जोरे व स्टाफ यांनी तात्काळ सदर ठिकाणी जावुन खातरजमा केली असता दोन मुले हे मोकळ्या जागेत थांबलेले दिसले. त्यांना आहे त्या स्थितीत ताब्यात घेवून चौकशी केली. तेव्हा ते अल्पवयीन असल्याचे समोर आले. तेव्हा त्यांना काळजीपुर्वक विश्वासात घेवून चौकशी केली असता त्यांचेजवळ जबरीने चोरीचे मोबाईल व झाडा झुडपामध्ये चोरीच्या एकुण ०५ दुचाकी गाड्या तसेच जबरीने चोरलेली रोख रक्कम असे दोन पंचासमक्ष पंचनाम्याने एकुण २,२८,५००/- रु. किंमतीचा मुददेमाल जप्त करण्यात आला आहे.

**सदर विधीसंघर्षीत बालकांकडुन खालील प्रमाणे एकुण जबरी चोरीचे ०२, वाहन चोरीचे ०५ असे मिळुन एकुण ०७ गुन्हे उघड करण्यात आले आहेत.**

१) मुंढवा पोलीस ठाणे गुर नं १३५/२०२३ भा द वी ३९२,३४
२) मुंढवा पोलीस ठाणे गुर नं २०३/२०२३ भा द वी ३९२,३४
३) मुंढवा पोलीस ठाणे गुर नं ११२/२०२३ भा द वी ३७९
४) मुंढवा पोलीस ठाणे गुर नं १८९/२०२३ भा द वी ३७९
५) हडपसर पोलीस ठाणे गुर नं ९४०/२०२३ भा द वी ३७९
६) हडपसर पोलीस ठाणे गुर नं ९४३/२०२३ भा द वी ३७९
७) हडपसर पोलीस ठाणे गुर नं ९४८/२०२३ भा द वी ३७९

सदरची कामगीरी मा.अपर पोलीस आयुक्त, पुर्व प्रादेशीक विभाग, पुणे शहर, श्री. रंजनकुमार शर्मा,मा.पोलीस उप-आयुक्त परिमंडळ ५,पुणे शहर, श्री.विक्रांत देशमुख,मा.सहा.पोलीस आयुक्त,हडपसर विभाग पुणे शहर श्रीमती अश्विनी राख, यांचे मार्गदर्शनाखाली श्री.विष्णु ताम्हाणे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, मुंढवा पोलीस ठाणे पुणे,पोलीस निरीक्षक (गुन्हे), श्री. प्रदिप काकडे, तपास पथकाचे अधिकारी संदिप जोरे, सहा. पोलीस निरीक्षक, व तपास पथकातील अंमलदार दिनेश राणे, दिनेश भांदुर्गे, वैभव मोरे, महेश पाठक, राहुल मोरे, स्वप्नील रासकर, सचिन पाटील यांनी केली आहे.


मुंढवा पोलीस ठाणे
मुंढवा पोलीस स्टेशन
पुणे शहर
ARMY